## <u>निशाणी क्र.११२ खालील आदेश</u>

प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ नाथा सोपान निकम यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी दाखल केलेला आहे.

(२) प्रतिदाव्यातील वादी यांचे असे कथन आहे की, वादी क्र.१ नाथा सोपान निकम हे दि.२९.०७.२०२४ रोजी मयत झाले आहेत. सदर दाव्यासंदर्भात प्रतिदाव्यातील वादी यांना माहिती नसल्याकारणाने वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झाला आहे. त्यामुळे, प्रतिदाव्यातील वादी यांना वादी क्र.१ यांचे वारस वेळेत अभिलेखावर आणता आले नाहीत. सदरचे वारस दावे कामी रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे.

प्रतिदाव्यातील वादी- नाथा सोपान निकम (मयत वारस)

१ अ) सयाजी नाथा निकम,(मुलगा)
वय-५० वर्षे, धंदा-शेती, रा.चिंचणी(म.),
ता.खानापूर, जि.सांगली.
१ ब) शोभा सुर्यप्रकाश खोपकर,(मुलगी)
वय-४८ वर्षे, धंदा-घरकाम,
रा.देवराष्ट्रे, ता.कडेगांव, जि.सांगली.

सदरचे वारस हे प्रतिदाव्यातील वादी क्र.१ यांचे जवळचे व कायदेशीर वारस असून सदर वारस दाव्याचे कामी अभिलेखावर येणे अत्यंत न्यायाचे व गरजेचे आहे. त्यामुळे, प्रतिदाव्यातील वादी क्र.१ चे नांवापुढे मयत वारस असे नमूद सदरील नमूद वारस अभिलेखावर घेणेची विनंती वादी यांनी केली आहे.

(३) प्रतिदाव्यातील प्रतिवादीतर्फे नि.क्र.११२ वरील अर्जावरच म्हणणे सादर करुन वारस दाखल करणेस आक्षेप नोंदवून वादीचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली. तसेच कोर्ट अर्ज मंजूर करणेचे निष्कर्षापर्यंत आलेस जास्तीत

जास्त भूर्दंड लावणेत यावा अशी विनंती केली.

(४) निशाणी क्र.११२ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ठ्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. प्रतिदाव्यातील वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिदाव्यातील वादी क्र.१ नाथा सोपान निकम हे दि.२९.०७.२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नि.क्र.१०९ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे सदर मयत वादी क्र.१ यांचे वारस हे प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार झालेले आहेत. तरी दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. प्रतिदाव्यातील वादींनी दाखल केलेली निशाणी क्र.१११ वरील व ११० वादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब व उपशम रद्द होणेबाबतचे अर्ज मंजूर करणेत आलेले आहेत. दाव्याचे स्वरुप विचारात घेता नैसर्गीक न्यायहिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रतिवादी यांना र.रु.३००/- इतका भूर्दंड देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

## आदेश

(१) निशाणी क्र.११२ कडील अर्ज प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रतिवादी यांना र.रु.३००/- (अक्षरी रुपये तीनशे मात्र) खर्च देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

(२) प्रतिदाव्यातील वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती या अर्जाचे आदेशापासून पुढील तारखेपर्यंत करावी व दुरुस्त अर्जाची प्रत हजर करावी.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.11.12 11:44:09 +0530

विटा.
दिनांकः- १०.११.२०२५.

(श्रीमती.व्ही.डी.शिरसे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude, |
| Name of the Court | :- | Smt.V.D.Shirse<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 10.11.2025 |
| Order signed by P.O. on | :- | 10.11.2025 |
| Order uploaded on | :- | 12.11.2025 |